सीपीटीपी-४ अंतर्गत परिविक्षाधीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना यशदा, पुणे येथे देण्यात येणा-या प्रशिक्षण खर्चास प्रशासकीय मंजुरी

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हिडी-०९१७/प्र.क्र.२११/परि-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ०६ मार्च २०१८

<u>वाचा</u>

1. **शासन निर्णय क्रमांक एमव्हिडी ०७१७/प्र.क्र.१८५/परि-४, दि. १६.०९.२०१७**
2. **परिवहन उप आयुक्त यांचे पत्र क्रमांकः क्र.पआका/का-१३/प्रशिक्षण-१२/ २०१७/जा. क्र. १६८५३, दि. १५.१२.२०१७.**

<u>प्रस्तावना</u>

राज्यसेवा मुख्य परिक्षा २०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट- ब या संवर्गामध्ये एका उमेदवाराची शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे गतवर्षी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ (२०१६) च्या प्रशिक्षणास रुजु होण्यास मुदतवाढ दिलेले ४ परिविक्षाधीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी असे एकुण ५ उमेदवारांसाठी संदर्भ क्र १ वरील दि. १६.०९.२०१७ च्या शासन निर्णयानुसार दि. ०१.०८.२०१७ पासुन दोन वर्षाच्या कालावधीसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर परिविक्षाधीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे सत्र क्र. २ चे प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे पुर्ण झाले आहे. सदर ५ परिविक्षाधीन अधिकारी यांचे आगामी काळात यशदा, पुणे येथे ६ आठवड्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. उक्त प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेस प्रशिक्षण खर्च अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४ (सीपीटीपी-४) अंतर्गत प्रशिक्षण घेत असलेले ५ परिविक्षाधीन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या यशदा, पुणे येथे होणा-या ६ आठवड्याच्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता रु. ४,२०,०००/- (रुपये चार लाख वीस हजार फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे

२. यासाठी येणारा प्रशिक्षणाचा खर्च, मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र. " बी-३, २०४१ वाहनावरील कर (०१)(०२) मोटार वाहन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण (योजनांतर्गत) (२०४१ ०३४१)-१३ कार्यालयीन खर्च " या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा

३. हे ज्ञापन, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग ३, अ.क्र.४, परिच्छेद क्र. २७ (२) (अ) नुसार प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०६११२७२७३२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.03.06 11:28:33 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, यशदा, पुणे.
४. उप सचिव (सीपीटीपी), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे.
८. निवडनस्ती, परिवहन-४.